**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-5(A)| May-2026

Original Article

# वामनदादा कर्डक यांच्या गीतातील स्त्री विचार

**डॉ. राजेंद्र रामनाथ गायकवाड**
मराठी विभाग, सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय, संगमनेर.ता. संगमनेर
**Email:** rajendragaikwad522@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180507
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 5(A)
Pp. 27-29
May- 2026
**Submitted:** 15 Apr. 2026
**Revised:** 25 Apr. 2026
**Accepted:** 10 May. 2026
**Published:** 31 May 2026

***सारांश***

*या संशोधन लेखामध्ये वामनदादा कर्डक यांच्या गीतांमधून व्यक्त झालेल्या स्त्रीविषयक विचारांचा अभ्यास करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, शिक्षण आणि सामाजिक परिवर्तनाच्या विचारांचा प्रभाव वामनदादा कर्डक यांच्या गीतांवर स्पष्टपणे दिसून येतो. त्यांच्या गीतांमध्ये दलित स्त्रीचे शोषण, दारिद्र्य, सामाजिक विषमता, अंधश्रद्धा, पुरुषसत्ताक व्यवस्थेमुळे निर्माण झालेल्या समस्या आणि तिचा संघर्ष यांचे वास्तववादी चित्रण केले आहे. तसेच महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमुळे स्त्रीमध्ये निर्माण झालेली शिक्षणाची जाणीव, स्वाभिमान, स्वावलंबन आणि परिवर्तनशील दृष्टिकोनही प्रभावीपणे मांडला आहे. ग्रामीण व दलित स्त्रीच्या जीवनातील विविध पैलू, तिच्या भावविश्वातील वेदना, कर्तव्यभावना आणि सामाजिक उन्नतीची आकांक्षा यांचे चित्रण त्यांच्या गीतांतून दिसते. स्त्री सक्षमीकरण, सामाजिक न्याय आणि मानवमुक्तीचा संदेश देणारे वामनदादा कर्डक यांचे स्त्रीविषयक विचार आजही प्रेरणादायी आणि समकालीन आहेत.*

***मुख्यशब्द:*** *वामनदादा कर्डक, स्त्री विचार, दलित स्त्री, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्त्री सक्षमीकरण, सामाजिक परिवर्तन, शिक्षण, समता, दलित साहित्य, ग्रामीण स्त्री.*

## प्रस्तावना

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समाज परिवर्तनाचा विचार, त्यांची राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक चळवळ आणि तिचा उद्देश, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समाजप्रबोधनाचा विचार दलित साहित्यामध्ये काही दलित कवींनी मांडलेला आहे.मराठी साहित्यात दलित चळवळीच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यात काही साहित्यिकांनी अत्यंत प्रभावी भूमिका बजावली आहे. त्यामध्ये वामनदादा कर्डक हे एक महत्त्वाचे नाव आहे. त्यांच्या कवितांमधून, गीतांमधून आणि विचारांमधून समाजातील विषमता, अन्याय, शोषण आणि विशेषतः स्त्रियांची स्थिती यावर त्यांनी प्रखरपणे भाष्य केले आहे.

## संशोधनाचे उद्दिष्ट

1. वामनदादा कर्डक यांच्या साहित्यातील स्त्रीप्रतिमा समजून घेणे
2. स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्थितीचे विश्लेषण करणे
3. स्त्री-मुक्तीच्या विचारांची मांडणी तपासणे
4. अन्याय अत्याचाराने पीडित झालेली स्त्री आणि तिचा संघर्ष.
5. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रभावित झालेली स्त्री आणि तिने स्वीकारलेले परिवर्तन.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. राजेंद्र रामनाथ गायकवाड मराठी विभाग, सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय, संगमनेर.ता. संगमनेर.*

**How to cite this article:**
*गायकवाड, राजेंद्र. रामनाथ. (2026). वामनदादा कर्डक यांच्या गीतातील स्त्री विचार. Journal of Research & Development, 18(5(A)), 27–29.* https://doi.org/10.5281/zenodo.20918852

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.20918852

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-5(A)| May-2026

**गीतातून चित्रित झालेली सामाजिक स्थिती:-**

वामनदादा कर्डक यांच्या साहित्यात स्त्रीची स्थिती अत्यंत दयनीय आणि संघर्षमय दाखवली आहे. दलित समाजातील स्त्री ही दुहेरी शोषणाची बळी ठरते. ग्रामीण भागातील स्त्री रीती, रिवाज, प्रथा परंपरा, श्रद्धा, अंधश्रद्धा या विश्वाभोवती सतत आणि सातत्याने गुंफलेली आहे. त्यातल्यात्यात दलित कुटुंबातील स्त्री म्हणजे शोषित, पीडित, परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रेरित झालेली स्त्री म्हणजे दलित स्त्री. बुद्ध, कबीर, फुले, आंबेडकर यांच्या विचाराचे प्रबोधन करणारी स्त्री. दलित समाजामध्ये पाहायला मिळते.

" बुद्ध,कबीर,भीमराव, फुले.

या भूमीवर जन्मले, त्यांनी जन जीवन फुलविले ग. शेजारीन सखुबाई." हा शिक्षणविषयक विचार, त्यातील क्रांती दलित स्त्री मोठ्या अभिमानाने मांडताना दिसून येते. कुठल्याही प्रकारचा शिक्षणाचा गंध नाही. केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीने प्रेरित झालेली स्त्री. मोठ्या आत्मीयतेने हा शिक्षण विषयक विचार मांडताना दिसते.

घराघरात फुले,शाहू आंबेडकरांचा विचार आणि त्यांचा जागर करणारी ही ग्रामीण भागातील दलित स्त्री वामनदादा कर्डक यांनी या गीतातून चित्रित केलेली आहे." दलित जीवनाचे वैविध्यपूर्ण चित्रन करताना वामनदादांनी दलित, ग्रामीण जीवनातील विविध घटकांवरती गीते लिहिले ली आहेत. दलित ग्रामीण स्त्रीचे चित्रनही त्यांनी अतिशय समर्पक रीतीने केले आहे. स्त्री चे जगणे तिचे दुःख, पुरुषसत्ताक व्यवस्थेत तिच्या वाट्याला आलेल्या रूढी प्रथा, परंपरा तिच्यावर लादली गेलेली बंधने यामुळे तिची होणारे घुसमट वामनदादांनी आपल्या गीतात मागे आहे. अशा स्त्री जीवनाचे उद्धारकर्ते महात्मा फुले वामनदादांना वंदनीय वाटतात.

"स्त्री जातीच्या मुक्तीसाठी आले महात्मा फुले ग
आणि महात्मा फुले मुलींची शिक्षण केले खुले ग."

महात्मा फुले यांनी श्री शिक्षणाविषयी केलेल्या कार्याचा उल्लेख करून वामनदादा श्री शिक्षणाचा आग्रह व्यक्त करताना खोल्यांच्या कार्याची घरी ओळख करून घेण्यासाठी भीम युगातील तरुणांना फुलांच्या वाड्याकडे जाण्याचे आवाहन करतात. जय हिंदू ईश्वर शास्त्र कधीच शूद्र अति सुत्रांच्या आणि स्त्रियांच्या बाजूचे नव्हते, जी हिंदू मिथके आणि कथा शूद्र अति शुद्रांना प्रेरणा पद झाली नाही, ती मिथके, ते देव त्यांच्या वर्गीय आशियासह अशिक्षित अर्धशिक्षित पण प्रचंड जागृत झालेल्या दलित तरुणांना कळून आली. स्त्रीला सुद्धा या चळवळीचा स्पर्श झाला. व ती सुद्धा चळवळीत उतरली. ती म्हणू लागली.

"खंडोबाला दिली सोडचिट्टी हो
डॉक्टर आंबेडकरांसाठी".

अज्ञान, दारिद्र्यात खितपत पडलेली स्त्री प्रगतीच्या मार्गाकडे वळली.तिने अन्याय, रूढी, परंपरा आचार, विचारांना देव दैवतांना व्रत वैकल्यांना नाकारू लागली. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीत ती सक्रिय झाली. परिवर्तनाच्या चळवळीमध्ये बाबासाहेबांनी स्त्री उद्धारला फार महत्व दिले होते. स्त्रीमुळेच हवेते संस्कार कुटुंबावर होत असतात याची जाणीव ठेवून स्त्रियांनी स्वच्छ राहावे, टापटीप,धैर्यवान, चारित्र्यशील सुशिक्षित व्हावे यासाठी ते सदैव उपदेश करीत. वामनदादांनी आपल्या प्रबोधन कार्यामध्ये बाबासाहेबांचा हाच विचार शिरोधार्य मानलेला दिसतो. याचाच परिणाम म्हणून महिला गप्पागोष्टी करताना लहान मुलांना खेळवताना झोपवतांना वामनदादा कर्डक यांची गीते गात असत. या गीतांमध्ये बाबासाहेबांच्या कार्याची थोरवी व महती सांगितलेली आहे.असे वेगळे सांगायला नको.

"भीमराव जीवाचा विसावा ग बाई.
माझा भीमराव जीवाचा विसावा
त्याचे नाव घेता माझा सीन भाग जातो
जसा काही भिम माझ्या मदतीला येतो.
सदा मनी तोची आठवावा."

ग्रामीण भागातली स्त्री बाबासाहेबांच्या महतीविषयी म्हणते भीमराव माझ्या जीवाचा दिसावा आहे. त्यांचे नाव घेतल्यास माझ्या शरीराचा थकवा जातो. शिनभाग जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची महती सांगणारे असे तत्त्वज्ञान वामनदादा गीतातून वारंवार सांगतात. बाबासाहेबांच्या महती बरोबर त्यांचे आई व पत्नी यांची थोरवी सांगायला सुद्धा दादा चुकत नाही.

वामनदादा कर्डक यांनी स्त्रियांचे संसारिक प्रबोधन करण्यासाठी अनेक भावगीतांची रचना केलेली दिसते. सासरी कसे वागावे? आपले स्वतःचे शील संवर्धन कसे करावे? या संदर्भात दादा स्त्रियांना मार्गदर्शन करतात. ते पुढील प्रमाणे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-5(A)| May-2026

“मुली जाशील आता दिल्या घरी
बोल आईचे ठेवून अंतरी
जरा जपून वागावे सासरी
शील असतया काचेचे भांड ”.

या गीत रचनेतून वामनदादा एका ग्रामीण भागातील स्त्रीला उद्देशून म्हणतात की, सासरी असताना शीलसंवर्धन, आपल्या कर्तव्याची जाणीव, शेजारणीशी कसे वागावे इत्यादी उपदेशाच्या मौलिक गोष्टी नववधूला ते सांगतात. ‘शील काचेचे भांडे असतं.’ म्हणून जपून वागावे सासरी. आपल्या आईवडिलांच्या कुळाचा आपल्या सासरकडील लोकांकडून उद्धार होऊ देऊ नये. ही आठवण मनात ठेवून मुलीने सासरी नांदायला पाहिजे. एवढा घरगुती, आपल्या कुटुंबातील सदस्य प्रमाणे वामनदादा नववधूला सल्ला देतात.

स्त्री जीवनाच्या विविध पैलूंना वामनदादा स्पर्श करतात. पुरुषप्रधान समाजरचनेत लग्नानंतर स्त्रियांचे माहेर तुटते.

“दुबळवाडी ची दुबळी बहीण!
डोंगर दरीत लोटली आईने!!
नको रे दादा डोळे पाण्याने भरू तू!
नको त्या संसाराची काळजी करू तू!!”

वामनदादानी सासुरवासीन स्त्रीचे दुःख समर्थपणे व्यक्त केले आहे. ‘बंधू र शिपाया’ या गीतात तिचा भाऊ तिची चोळी आणि बाळाच्या बिंदल्या विकत घेऊ शकत नाही. कारण तिच्यासारखा तोही दुबळा आहे. म्हणून ही स्त्री वरील गीतात म्हणते. दारिद्र्यात खितपत पडलेल्या भावाला बहीण सांगते, तू माझ्या संसाराची काळजी मुळीच करू नको. आपण दोघेही परिस्थितीत दुबळे आहोत. आंबेडकरी विचाराची संपत्ती तुम्हाला पुढील काळाच्या संसारात भरभराट आणील आणि आर्थिक सौख्य नांदायला लागेल. बड्या बागायतदारांच्या शेतावर ज्या शेतमजूर स्त्रीया कामाला जातात त्यात दलित स्त्रियांचे प्रमाण प्रचंड आहे. कामाला आलेल्या इतर जातीच्या स्त्रियांनी जातीचा किंतु मनात न आणता, श्रमाच्या धाग्याने एकत्र राहा, अशी दलित स्त्री आपल्या समाज बांधवांना विनंती करते.डॉ. आंबेडकरांनी हिंदू कोड बिल आणले परंतु त्यासाठी चळवळ उभारण्याची परिस्थिती त्यांच्याकडे नव्हती. वामनदादाच्या गीतातून स्त्री मुक्तीवर फारसा भर दिला गेलेला नाही. ग्रामीण जीवन जगणारी स्त्री, सासुरवाशीन स्त्री, बड्या बागायतदारांच्या शेतावर काम करणारी दलित स्त्री,या सर्व वर्गातील स्त्रियांविषयी वामनदादांच्या मनात अस्था मात्र कायम आहे.

**निष्कर्ष:**

वामनदादा कर्डक यांच्या स्त्री विषयक अतिशय प्रेरणादायी आहे. या गीत रचनेत श्री सशक्तीकरणाचा, सबलीकरनाचा, स्वावलंबनाचा संदेश वामनदादा देतात. स्त्रियांना त्यांच्या मूलभूत अधिकार आणि हक्काची जाणीव करून देणे, आंबेडकरी चळवळीचा प्रचार आणि प्रसार करणे हे स्त्रियांचीही तेवढेच महत्त्वाचे काम आहे. पुरुषसत्ताक सांस्कृतिक कडून स्त्रियावर होणारे अन्याय अत्याचार या विरुद्धही वामनदादा कर्डक आपल्या गीतातून आवाज उठवतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीप्रती असणार आत्मस्वावलंबनाचा धोरण वामनदादा आपल्या गीतातून अधोरेखित करतात.

**संदर्भ ग्रंथ**

1. भगत सूर्यकांत – महान लोककवी वामन दादा कर्डक. योगेश प्रकाश, प्रथम आवृत्ती 14 एप्रिल 2003. पृ. 53.
2. प्रा. गुंजाळ बाळासाहेब, प्रा. शिंदे अशोक, प्रा. शेळके भास्कर,- काव्यकस्तुरी प्रथम आवृत्ती 15 ऑगस्ट 2006, मुद्रिक प्रेस, पुणे.